जा.क्र.ना.बँका/डी-४/पतसंस्था/सर्वेक्षण/२००८/१२८२
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था.
महाराष्ट्र राज्य, पुणे – यांचे कार्यालय
दिनांक – ११ ऑगस्टं २००८

# परिपत्रक

राज्यामध्ये सुमारे १८,६२८ नागरी सहकारी पतसंस्था असून त्यापैकी ४६२ नागरी सहकारी पतसंस्था या आर्थिक अडचणीत असल्यामुळे ठेवीदारांच्या ठेवी परत करु शकत नाहीत असे निदर्शनास आलेले आहे.

नागरी सहकारी पतसंस्थांची संख्या विचारात घेता ती मोठ्या प्रमाणात असून त्यामुळे नियंत्रणाच्या दृष्टीने काही मर्यादा निर्माण होतात. नागरी सहकारी पतसंस्थांचा गुणात्मक विकास होण्याच्या दृष्टीने त्यांची संख्या ही मर्यादित असणे अत्यंत आवश्यक आहे. अस्तित्वातील नागरी सहकारी पतसंस्थांची माहिती घेता, त्यापैकी अनेक पतसंस्थांनी नोंदणी झाल्यानंतर प्रत्यक्ष कामकाजही सुरु केलेले नसल्याचे किंवा त्या बंद अवस्थेत असल्याचे दिसून आलेले आहे. ही बाब विचारात घेता राज्यातील सर्व नागरी सहकारी पतसंस्थांचे सर्वेक्षण होणे अत्यंत आवश्यक आहे.

सबब या परिपत्रकान्वये सर्व विभागीय सहनिबंधक, जिल्हा उपनिबंधक व तालुका उप/सहायक निबंधक यांना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१) संबधीत निबंधक यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात असलेल्या सर्व नागरी सहकारी पतसंस्थांचे (राज्य कार्यक्षेत्र असलेल्या पतसंस्थांबाबत सदर संस्थेचे मुख्यालय ज्या ठिकाणी आहे त्या उप/सहाय्यक निबंधकांनी त्या संस्थेचे सर्वेक्षण करावयाचे आहे.) सर्वेक्षण कामकाज दि. ३१ ऑगस्ट २००८ पर्यंत पूर्ण करावयाचे आहे. सोबत सर्वेक्षणाचा नमुना जोडलेला आहे.

२) सर्वेक्षणामध्ये पूर्णतः कामकाज बंद आढळलेल्या संस्थांचा बँक खाते उतारा तपासून व त्याबाबतची पूर्णतः खात्री करुन घेऊन संबंधीत निबंधकांनी सदर संस्था तात्काळ अवसायनात काढावयाच्या आहेत. अशा संस्था राज्यस्तरावरील असल्यास त्याबाबतचा अहवाल संबंधीत विभागीय सहनिबंधक/जिल्हा उपनिबंधक/ तालुका उप-सहायक निबंधक यांनी तात्काळ सहकार आयुक्त कार्यालयास सादर करावयाचा आहे.

३) उर्वरीत संस्थांचे अ, ब, क आणि ड या लेखापरीक्षण वर्गवारीनुसार वर्गीकरण करण्यात येऊन ड लेखापरीक्षण वर्गवारीतील संस्थांबाबत सर्वेक्षण नमुन्यातील प्राप्त आर्थिक स्थितीचा व सक्षमतेचा विचार करुन व त्याबाबतची खात्री करुन घेऊन सदर संस्था अवसायनात घेण्याबाबत तात्काळ कार्यवाही करावयाची आहे.

४) अवसायनात काढण्यात येणाऱ्या पतसंस्थांचे अंतरीम अवसायानाचे आदेश काढण्याचे कामकाज कोणत्याही परिस्थितीत दि. १५ सप्टेंबर २००८ पर्यंत पूर्ण करावयाचे आहे. तसेच अशा संस्थांचे अंतिम आदेश काढण्याचे कामकाज कोणत्याही परिस्थितीत दि. ३१ ऑक्टोबर २००८ अखेर पूर्ण करावयाचे आहे.

५) क वर्गातील नागरी सहकारी पतसंस्थांबाबत त्या संस्थांची अर्थिक स्थिती विचारात घेऊन भाग भांडवल पाया भक्कम करणे, संस्थेची तरलता वाढविण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे, कमी व्याजदराच्या ठेवी वाढविणे तसेच अशा संस्थांची वसुली वाढविण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे या बाबत निश्चित कालबध्द कार्यक्रम संबंधीत विभागीय/जिल्हा/तालुका निबंधक यांनी घ्यावयाचा आहे.

संबंधीत विभागीय सहनिबंधक यांनी त्यांचे विभागामध्ये सर्वेक्षणाचे कामकाज विहीत मुदतीत पूर्ण होईल या बाबतची दक्षता घ्यावयाची आहे. या बाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधीत विभागीय सहनिबंधक यांची राहील.

सर्वेक्षणाचे कामकाजावर नियंत्रण करणेसाठी तसेच सद्यस्थितीतील अडचणीतील पतसंस्थांचे वसुली व कारवाईचे अनुषंगाने सहकार आयुक्त स्तरावरील खालील अधिकारी यांची पालक अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

१) कोल्हापूर – श्री. बी.बी. शेळके, अप्पर आयुक्त.

२) धुळे – श्री. एस.डी.मुन, अपर निबंधक (लेखापरीक्षण)

३) नाशिक – श्री. मनोहर त्रिभुवन, अपर निबंधक

४) जळगाव –

५) सांगली – श्री. दिनेश ओऊळकर, सहनिबंधक

६) पुणे/सोलापूर – श्री. शैलेश कोतमिरे, सहनिबंधक

सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य पुणे.

प्रत–
१) विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
२) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
३) तालुका उप/सहायक निबंधक सहकारी संस्था (सर्व)
४) उपरोक्त अधिकारी – नावाने

# सर्वेक्षण नमुना

| अ.क्र. | विषय | तपशील |
|---|---|---|
| १) | ठेवी | ठेवीदार संख्या रक्कम |
| २) | कर्जे | |
| ३) | सभासद संख्या | |
| ४) | ठेवींचे वर्गीकरण | |
| ५) | भाग भांडवल | |
| ६) | राखीव निधी | |
| ७) | गुंतवणूक | |
| ८) | रोख शिल्लक | |
| ९) | मागील तीन वर्षाचे लेखापरिक्षण वर्ग | |
| १०) | नफा/तोटा | |
| ११) | सर्वात मोठे १० कर्जदार | |
| १२) | थकबाकीचे प्रमाण | |
| १३) | थकबाकीदार | |

२) कर्जे

| कर्जदार संख्या | रक्कम |
|---|---|
| | |

४) ठेवींचे वर्गीकरण

| अ.क्र. | तपशील | संख्या | रक्कम |
|---|---|---|---|
| १) | ० ते १०,००० | | |
| २) | १०,००० ते ५०,००० | | |
| ३) | ५०,००० ते १ लाख | | |
| ४) | १ लाख व १ लाखाचे वरील | | |

११) सर्वात मोठे १० कर्जदार

| अ.क्र. | कर्जदाराचे नाव | कर्ज रक्कम |
|---|---|---|
| | | |

१३) थकबाकीदार

| संख्या | रक्कम |
|---|---|
| | |